CMYK

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 56 ■ गुरूवार, 03 एप्रिल 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5

# दैनिक आरंभ मराठी

arambhmarathi535@gmail.com

### धाराशिव बस स्थानकावरुन सोन्याच्या दागिन्यांची चोरी

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव बस स्थानकावरून एका महिलेचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. फिर्यादी अनुराधा विक्रम जाधव (वय ४० वर्षे, रा. आनंदनगर धाराशिव) या दिनांक २४ मार्च रोजी रात्री सव्वा आठ वाजता बसस्थानक धाराशिव येथे धाराशिव येथुन इंदापुर येथे जात असताना, त्यांच्या पर्स मधील ५७००० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अनुराधा जाधव यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### जादूटोणा करुन बापाला मारले म्हणत हाणामारी

आरंभ मराठी । भूम

जादूटोणा करून माझ्या बापाला मारले म्हणत भूम तालुक्यातील गोलेगाव पारधी पिढी येथे हाणामारी झाली. आरोपी शिवाजी हरिदास काळे (रा. गोलेगाव पारधीपिडी ता. भुम) याने १ एप्रिल रोजी वरद हॉटेल भुम येथे फिर्यादी यशवंत प्रकाश शिंदे (वय ३५ वर्षे, रा. गोलेगाव पारधीपिडी) यांना तू जादुटोणा करुन माझ्या बापाला मारले या कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, फायटरने मारहाण करुन जखमी केले. यशवंत शिंदे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# उन्हाने विद्यार्थी व्याकुळ, शासनाला घाम फुटेना !



## राज्यात एकाचवेळी परीक्षा घेण्याच्या शासनाच्या धोरणाचा विद्यार्थ्यांना फटका

आरंभ मराठी । धाराशिव

**राज्यातील सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते नववीच्या वार्षिक लेखी परीक्षा आणि मूल्यमापन चाचणीचे आयोजन एकाच वेळी करण्याचे निर्देश राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य यांनी दिले आहेत. या परीक्षा एप्रिल महिन्यात शाळा स्तरावर होणार असून, यासाठी प्रश्नपत्रिका राज्य शासनाकडून पुरवली जाणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांची दमछाक होणार आहे, त्यामुळे शिक्षक संघटनांनी या निर्णयाला विरोध दर्शविला आहे. धाराशिव जिल्ह्यात देखील वाढत्या उन्हामुळे परीक्षेचे हे टाईमटेबल पाळणे शक्य नसल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. शैक्षणिक वेळापत्रकाचा हा प्रश्न दिवसेंदिवस तापत आहे.**

राज्यातील शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ९ वी वर्गाच्या परीक्षा दरवर्षी साधारणपणे मार्च महिन्याच्या अखेरीस किंवा एप्रिल महिन्यामध्ये शाळा स्तरावरून घेण्यात येतात. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला वार्षिक परीक्षा पूर्ण झाल्यावर त्यानंतरच्या कालावधीत शाळा सुरू असल्या तरी विद्यार्थी उपस्थिती पुरेशी नसते. अशा पद्धतीने परीक्षांचे आयोजन वर्षाअखेर करण्याऐवजी लवकर केल्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी मिळणारा कालावधी कमी होतो. तसेच प्रत्येक शाळेचे वेळापत्रक वेगवेगळे असल्याचे निदर्शनास येते. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळांमध्ये एकवाक्यता असावी व उपलब्ध वेळेचा पुरेपूर उपयोग विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी व्हावा, यासाठी पुणे येथील राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद संचालकांनी पत्राद्वारे राज्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ९ वीच्या परीक्षेसाठी वार्षिक वेळापत्रक जाहीर केले आहे. या वेळापत्रका नुसार परीक्षांचे आयोजन होईल यादृष्टीने सूचना शाळांना दिल्या आहेत. अपवादात्मक अथवा स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन या नियोजनात बदल करावयाचे असल्यास शिक्षणाधिकारी यांनी संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांची परवानगी घेऊनच बदल करावा, असे आदेशात म्हंटले आहे. तसेच १ मे रोजी ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांचा परीक्षा निकाल जाहीर करण्याचे आदेश यामध्ये देण्यात आले आहेत. या वेळापत्रकाला आता सर्वच स्तरातून विरोध होत आहे.

### शासनाच्या तुघलकी निर्णयाला सगळ्यांचाच विरोध



इयत्ता पहिली ते नववीच्या परीक्षा एकाचवेळी आणि त्याही एप्रिल महिन्यात घेण्याच्या शासनाच्या निर्णयाला तुघलकी निर्णय म्हणावे लागेल. मुंबईत एसीमध्ये बसून मराठवाडा आणि विदर्भाची भौगोलिक परिस्थिती माहिती नसणाऱ्या व्यक्ती असे निर्णय घेतात. ग्रामीण भागात, शाळेला वर्गखोल्या नाहीत, असतील तर त्यावर व्यवस्थित पत्रे नाहीत, पिण्याच्या पाण्याची सोय नाही अशा परिस्थितीत एप्रिल महिन्यात विद्यार्थ्यांना शाळेत कसे बसवायचे हा प्रश्न आहे. मराठवाडा आणि विदर्भाला शासनाने दिलेले वेळापत्रक पाळणे अशक्य आहे त्यामुळे हा निर्णय तात्काळ बदलावा.

**–प्रवीण स्वामी आमदार, उमरगा–लोहारा.**

### संघटनांची मागणी वरिष्ठ स्तरावर पाठवली

पाहिले ते नववीच्या परीक्षा एकाचवेळी घेण्याच्या निर्णयाला शिक्षक संघटनांनी विरोध केला आहे. परंतु, हा निर्णय राज्य स्तरावर घेतल्यामुळे शिक्षक संघटनांची मागणी वरिष्ठ पातळीवर पाठवण्यात आलेली आहे.

**–अशोक पाटील**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**



### शिक्षक संघटनांचा निर्णयाला विरोध

सरकारने घेतलेल्या या निर्णयावर शिक्षक संघटनांनी तुघलकी निर्णय म्हणत टीका केली आहे. एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये राज्यात शाळा स्तरावरून सर्वत्र विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या जातात. एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात उन्हाच्या वाढत्या झळा पाहून विद्यार्थी शाळेत येत नाहीत. ग्रामीण भागातील शाळांवर पत्रे असल्याने वर्गात गर्मी असते. शिवाय ग्रामीण भागात शाळेत विद्युत व्यवस्था नसल्याने वर्गात पंखा नसणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात परीक्षा घेणे म्हणजे विद्यार्थ्यांना त्रास देण्यासारखे आहे असे संघटनेचे म्हणणे आहे. तसेच विद्यार्थ्यांना उष्माघाताचा त्रास होऊ शकतो. २५ एप्रिलनंतर पेपर तपासणे व निकाल तयार करण्यासाठी शिक्षकांना अपुरा वेळ मिळणार आहे. शिक्षण विभागाने इयत्ता पहिली ते नववीच्या परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे घेण्याबाबतच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे.

## धाराशिवमध्ये आज शिवसेनेचा सन्मान मेळावा

### शिवसैनिकांनी उपस्थित रहावे, जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांचे आवाहन

आरंभ मराठी । धाराशिव



विधान परिषदेच्या उपसभापती तथा शिवसेना पक्षाच्या उपनेत्या डॉ.नीलमताई गोर्हे यांच्या उपस्थितीत शिवसैनिकांचा मेळावा गुरुवार, ३ एप्रिल रोजी शहरातील पुष्पक मंगल कार्यालयात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास शिवसैनिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज राजाभाऊ साळुंके यांनी केले आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोर्हे गुरुवारी धाराशिव जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत धाराशिव शहरातील पुष्पक मंगल कार्यालयात शिवसैनिकांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात डॉ. नीलमताई गोर्हे शिवसैनिकांना संबोधित करणार आहेत. शिवसेना प्रमुख पदाधिकारी व शिवसैनिक, महिला आघाडी, युवासेना, तसेच शिवसेनाच्या सर्व अंगीकृत संघटनानी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज राजाभाऊ साळुंके यांनी केले आहे.

## तुळजापुरमध्ये खाजगी पार्किंग ठेकेदारांकडून पार्किंगच्या नावाने भाविकांची लूट

### नगरपालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान

आरंभ मराठी । तुळजापूर



तुळजापूर शहरात येणाऱ्या भाविकांच्या वाहनाला पन्नास रुपये प्रमाणे प्रवेश कर नगरपालिकेकडून आकारण्यात येतो. दरम्यान याचाच फायदा घेत काही खाजगी पार्किंग ठेकेदारांनी कोऱ्या पावत्या देत भाविकांकडून ५० रुपये वसूल करण्याचे काम सुरू असून, यामुळे नगरपालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. याबाबत नगरपालिकेकडे चौकशी केली असता खाजगी ठेकेदारास उद्या नोटीस काढण्यात येणार असल्याचे नगरपरिषेकडून सांगण्यात आले. तुळजापूर येथे येणाऱ्या वाहनाधारकांसाठी पन्नास रुपये वाहन प्रवेश कर आकारण्यात येतो. यापूर्वी हा ठेका एका ठेकेदारास देण्यात आला होता. दरम्यान फेब्रुवारी महिन्यात हा ठेका संपल्यानंतर नगर परिषदेकडून कर्मचारी लावून वाहनधारकांकडून पन्नास रुपये घेऊन नगरपरिषदेचा शिक्का असलेली पावती दिली जाते. याचाच फायदा घेत काही खाजगी पार्किंग वाल्यांनी पन्नास रुपये लिहिलेल्या कोऱ्या पावत्या छापून या भाविकांना देऊन त्यांच्याकडून पैसे वसूल करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या तिजोरीत जाणारे लाखो रुपये खाजगी पार्किंग वाल्याच्या खिशात जात असल्याचे दिसून येत आहे. याबाबत नगरपालिका नोटीस काढणार असल्याचे सांगण्यात येत असले तरी इतके दिवस नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष कसे झाले हा प्रश्न निर्माण होत आहे. भाविकांना कुठल्याही सुविधा देण्यात येत नसताना त्यांच्याकडून हा कर आकारण्यात येत असल्याने याबाबत भाविकांतून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होत आहे.

## संत गोरोबा काका मंदिराच्या महाद्वाराची (कमानीची) जागा बदलण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषण

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव तालुक्यातील तेर येथील संत गोरोबा काका मंदिराच्या महाद्वार कमानीच्या बांधकामाची जागा बदलण्याच्या मागणीसाठी तेरचे माजी सरपंच महादेव खटावकर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवारपासून (दि.२) आमरण उपोषणास बसले आहेत. संत गोरोबा काका मंदिरांच्या महाद्वाराची जागा बदलण्यात यावी म्हणून सर्व संबंधितांना कळविण्यात येऊन सुध्दा प्रस्तावीत जागा बदलण्यात आली नाही. याशिवाय मंदिर परिसरात होत असलेली बोगस कामे, चुकीच्या पद्धतीने बांधलेले शौचालय याविषयी वेळोवेळी मंदिर प्रशासन, संबंधित यंत्रणा यांना कळवून सुध्दा मनमानी सुरू आहे. भाविकांच्या भावना लक्षात घेऊन महाद्वाराच्या कमानीचे काम वास्तूशास्त्राप्रमाणे पूर्व दिशेला करण्यात यावे, जागा बदलण्यात आली नाही तर भाविक, ग्रामस्थ , वारकरी संप्रदायाचे प्रमुख यांना सोबत घेऊन २ एप्रील रोजी आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा महादेव खटावकर यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला होता. त्यानुसार खटावकर यांनी तेर येथील काही ग्रामस्थांसह कुंभार समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

## वर्गणीसाठी जबरदस्ती केल्यास कठोर कारवाई

### पोलीस अधीक्षक संजय जाधव यांचा इशारा

**व्यापारी महासंघासोबत पोलीस प्रशासनाने घेतली बैठक**



आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील विविध महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करण्यासाठी तसेच विविध उत्सव साजरे करण्यासाठी व्यापाऱ्यांकडून आणि दुकानदारांकडून जोर जबरदस्तीने वर्गणी गोळा करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याच्याविरुद्ध कडक कार्यवाही करण्याचा इशारा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी दिला. बुधवारी (दि.२) पोलीस अधीक्षक कार्यालयातील मिटींग हॉलमध्ये पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली धाराशिव जिल्ह्यातील विविध व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये व्यापाऱ्यांनी त्यांच्याकडून जोर–जबरदस्तीने व अरेरावी करुन वर्गणी घेतली जात असल्याबाबत तक्रार केली तसेच कायदेशीर संरक्षण देण्याचीही मागणी केली.

याबाबत पोलीस अधीक्षक यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, धाराशिव जिल्ह्यात जोर जबरदस्ती चालणार नाही. कोणत्याही वर्गणीबाबत कोणी असामाजिक घटक जोर जबरदस्ती करत असेल तर त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, त्याबाबत निर्भय होवून तक्रार दाखल करण्याबाबतही त्यांनी सांगितले. केलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेतली जाईल असाही शब्द त्यांनी यावेळी दिला. तसेच पोलीस स्टेशन येथील अधिकारी, बीट अंमलदार यांचे मोबाईल नंबर प्रसारीत करण्यात येतील. तसेच धाराशिव जिल्ह्यात व्यापारी पेठांमध्ये पोलीसांची पेट्रोलिंग वाढविली जाणार असुन visible policing केली जाणार असल्याबाबतही पोलीस अधीक्षकांनी आश्र्वासित केले. या बैठकीकरिता पोलीस अधीक्षक संजय जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी, स्वप्नील राठोड, जिल्ह्यातील विविध व्यापारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी कॅटचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष संजय मंत्री, मराठवाडा उपाध्यक्ष संजय मोदानी, जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत (बंटी) जाधव, सराफ सुवर्णकार असोसिएशनचे कपील शर्मा, हॉटेल ॲन्ड बार असोसिएशनचे बापू सूर्यवंशी, जिल्हा सिड्स ॲन्ड फर्टिलायजर असोसिएशनचे संजय मोदानी, जिल्हा मशिनरी असोसिएशनचे अविनाश काळे, जिल्हा फर्निचर ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्सचे अजहर खान, जिल्हा मुद्रक संघाचे महादेव मुळे, तालुका व्यापारी महासंघाचे नितीन फंड, उपाध्यक्ष विशाल थोरात, अमित मोदानी, संपतराव डोके, जिल्हा सचिव महेश वडगावकर, नितिन नायर, सुभाष शेट्टी, श्याम बजाज व इतर व्यापारी उपस्थित होते.

### खाजगी क्रीडा अकादमींना मिशन लक्ष्यवेध अंतर्गत आर्थिक मदत मिळणार; ४ एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

आरंभ मराठी । धाराशिव

राज्यातील खेळाडूंना ऑलिंपिकसह आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत यश मिळवण्यासाठी आणि उत्कृष्ट क्रीडा संस्कृती विकसित करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने मिशन लक्ष्यवेध ही महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली आहे. या योजनेअंतर्गत ॲथलेटिक्स,आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी, लॉन टेनिस, रोईंग, शूटिंग, सेलिंग, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग आणि कुस्ती या १२ क्रीडा प्रकारांमध्ये उत्कृष्ट खेळाडू घडवणाऱ्या खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे.

## आंतरजातीय विवाह अनुदानाची तीन वर्षांची प्रतिक्षा संपली

### जिल्ह्यातील ४० जोडप्यांना २० लाख रुपयांचे वाटप



आरंभ मराठी । धाराशिव

केंद्र शासनाच्या आंतरजातीय विवाह प्रोत्साहन अनुदानास पात्र ठरलेल्या धाराशिव जिल्ह्यातील ४० जोडप्यांच्या संयुक्त खात्यावर प्रत्येकी ५० हजार रुपये जमा करण्याची प्रक्रिया जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाच्या वतीने सुरु करण्यात आली आहे. यानिमित्ताने गेल्या तीन वर्षांपासून अनुदानाकडे वाट पाहत असलेल्यांची प्रतीक्षा संपली. जिल्ह्यातील आंतरजातीय विवाह केलेल्या ४० जोडप्यांना अनुदान देण्यासाठी २० लाख रुपयांची रक्कम बँकेकडे वर्ग करण्यात आली आहे. बँकेकडून सदर विवाहित जोडप्यांच्या संयुक्त खात्यावर ऑनलाईन पध्दतीने रक्कम वर्ग करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या योजनेसाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे लाभार्थी जोडप्यांना प्रतीक्षा करावी लागली. २०२२–२३ ते २०२४–२५ या सलग तीन आर्थिक वर्षात शासनाकडून या योजनेसाठी अनुदान प्राप्त झाले नव्हते. या तीन वर्षात आंतरजातीय विवाह केलेली ४० जोडपी अनुदानाच्या प्रतीक्षेत होती. त्यांना आता दिलासा मिळाला आहे. समाजकल्याण विभागाला या योजनेचे पैसे वितरित करण्यासाठी २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता. यातून ४० जोडप्यांना अनुदानाचे वाटप करण्यात आले. सदर अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी वधू किंवा वर ही अनुसूचित जाती जमातीतील असावी, समाजकल्याण विभागाकडे रितसर अर्ज करणे बंधनकारक आहे.

### पात्र जोडप्यांनी तात्काळ प्रस्ताव सादर करावेत

आंतरजातीय विवाह केलेल्या ज्या जोडप्यांनी अद्यापपर्यंत धाराशिव जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाकडे अनुदानासाठी प्रस्ताव सादर केले नाहीत त्यांनी तात्काळ परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत. मागील तीन वर्षांपासून निधी उपलब्ध नव्हता त्यामुळे या योजनेचे पैसे वितरित करण्यास उशीर झाला. या योजनेतून एकूण ४० जोडप्यांना २० लाख रुपयांचे वाटप करण्यात आले आहे.

**–सुनील खमीतकर**
**जिल्हा समाजकल्याण अधिकारी, धाराशिव.**

## आठ वर्षापासून गुंगारा देणाऱ्या आरोपीस डिकसळ येथून अटक

**आरोपी मयत झाल्याचे खोटे प्रमाणपत्र न्यायालयात केले होते सादर**

आरंभ मराठी । कळंब



न्यायालयास गेल्या आठ वर्षांपासून गुंगारा देऊन फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कळंब तालुक्यातील डिकसळ येथून ताब्यात घेतले. येरमाळा पोलीस ठाण्यात आणि धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल असलेला आणि एनबीडब्लू वॉरंट मधील आरोपी बबन आबा शिंदे (रा. पिंपळगाव (क) ता. वाशी, ह.मु. कल्पनानगर,कळंब) हा गेल्या आठ वर्षापासून वेगवेगळ्या ठिकाणी वेष बदलून राहत होता. तसेच त्याच्या वडीलांनी बबन हा मयत झाला असल्याचे प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केले होते. त्या अनुषंगाने वेगवेगळ्या पथकामार्फत शोध घेवूनही बबन हाती लागत नसल्याने धाराशिव येथील सत्र न्यायालयाने पोलीस अधीक्षक यांना आरोपीला।शोधण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक नेमण्याचा आदेश दिला होता. यावरून पोलीस अधीक्षक संजय जाधव व अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या आदेशावरून दिनांक १ एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि विनोद इज्ञपवार, सपोनि सचिन खटके, अमोल मोरे व पोह– विनोद जानराव, समाधान वाघमारे, पोना– नितीन जाधवर, बबन जाधवर, चा.पोह– महेबुब अरब व पोअं– प्रकाश बोईनवाड यांचे पथक नेमून त्यांच्याकडे आरोपीला शोधण्याची कामगिरी दिली होती. आरोपीचा कळंब परिसरात शोध घेत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आरोपी हा सध्या डिकसळ येथे आहे. त्यावरुन पथकाने त्या ठिकाणी जावून आरोपीचा शोध घेतला असता, हाती लागला. त्याला ताब्यात घेवून न्यायालयासमक्ष हजर केले असता न्यायालयाने आरोपीची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

CMYK

## वाहनांवर नियंत्रण आणायला हवे

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पुणेकरांनी जोरदार वाहनांची खरेदी केल्याचे समोर आले आहे. गुढीाडव्याच्या दिवशी १० हजार १७० वाहनांची खरेदी केली. त्यात ६५१० दुचाकी, २४२४ चारचाकी, ५१७ गुड्स, २८३ रिक्षा, ६८ बस, २३४ टॅक्सी, १३४ अन्य वाहने पुणेकरांनी खरेदी केल्याची नोंद आरटीओत करण्यात आली. मागील वर्षापेक्षा या वर्षी वाहन खरेदीची संख्या तीन हजाराने अधिक आहे. मागच्या वर्षी याच काळात ७३३६ वाहनांची नोंद झाली होती याचाच अर्थ मागील वर्षी पेक्षा यावर्षी अधिक वाहनांची खरेदी पुणेकरांनी केली. आधीच पुणे शहरात वाहनांची संख्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. त्यात या दहा हजार वाहनांची भार पडली आहे. केवळ पुणे शहरातच एका दिवशी दहा हजारांपेक्षा अधिक वाहनांची खरेदी झाली याचाच अर्थ राज्यातील इतर शहरातही वाहनांच्या खरेदीने उच्चांक केला आहे. पुण्यापेक्षा मुंबई, ठाणे या शहरात अधिक वाहनांची खरेदी झाल्याची बाब समोर आली आहे. प्रत्येक शहरात साधारणपणे पाच हजार वाहनांची खरेदी झाल्याचे गृहीत धरले तरी हा आकडा खूप मोठा होतो. पुण्याप्रमाणेच मुंबई शहरातही वाहनांची संख्या अधिक आहे. मुंबईत चार चाकी आणि दुचाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहेत. शिवाय पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या वाहनांमुळे मुंबई, पुण्यातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण याची ना कोणाला फिकीर ना खंत. एकेकाळी पुणे शहर हे सायकलींचे शहर म्हणून ओळखले जायचे ती ओळख आता पुसली गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी कमालीची वाढली आहे. प्रदूषणामुळे दिल्लीची काय अवस्था झाली आहे ते आपण पाहतोच आहे, दिल्ली प्रमाणेच इतर शहरांची अवस्था व्हायला नको असेल तर वाहनांवर नियंत्रण आणायला हवे. नवीन वाहने विकत घेण्यापेक्षा बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर नागरिकांनी करायला हवा पण नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर विश्र्वास नाही. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे. म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. पुण्यामुंबई सारख्या शहरातील वाहनांची संख्या कमी करायची असेल तर बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना योग्य सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्यास पुण्यामुंबईतील वाहनांच्या संख्येवर नियंत्रण येईल यात शंका नाही.

# २१ व्या शतकातील आव्हाने





**किशोर जाधव**
मो. ९९२२८८२५४१
सोलापूर

बदल हा निसर्गाचा नियम आहे. आपल्या आजूबाजूला अनेक गोष्टी झपाट्याने बदलत आहेत.' सक्षम ते जगतील' असा सांगणारा नैसर्गिक निवडीचा सिद्धांत चार्ल्स डार्विन यानी मांडला. आता २१ व्या शतकात मानवी लढाई ही जगण्या मरण्याची नसली, तरी आपल्या जगण्याचा अर्थ शोधणारी नक्कीच आहे. एकविसावे शतक सुरू होऊन या शतकाची २५ वर्षे हा हा म्हणता निघून गेली. गेलेल्या २५ वर्षात या शतकाला दिशा देण्याचे काम नक्कीच झाले. २०४७ मध्ये भारत आपल्या स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करेल. महासत्तेकडे वाटचाल करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या आपल्या देशाला त्या स्वप्नाकडे घेऊन जाणाऱ्या आजच्या पिढीला खूप कष्ट घ्यावे लागणार आहे. म्हणून नव्या शतकाच्या बदलाचा ट्रेंड तरुण पिढीला माहित असणे आवश्यक आहे. भाषा, संस्कार, संस्कृती, तंत्रज्ञान ही आजच्या बदलत्या जगाची चार चाके आहेत. २० वे शतक हे टोकाच्या मानवी संघर्षाचे होते. याच शतकात भांडवलशाही आणि त्यातून निर्माण झालेला वसाहतवाद यामुळे वर्चस्वादी वृत्तीतून मानव जातीने दोन महायुद्धे पाहिली. यातून मानवाला फार मोठा धडा मिळाला. ' स्वातंत्र्य ' हीच प्रत्येक देशाची आणि व्यक्तीची महत्त्वपूर्ण गरज आहे; हे ओळखून शतकाच्या उत्तरार्धात अनेक देश युरोपीय देशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाले. आज एकविसाव्या शतकातील जग हे विसाव्या शतकापेक्षा अनेक बाबतीत भिन्न आहे.विसाव्या शतकात इंग्रजी ही जागतिक भाषा बनू पाहत होती. ती ज्ञानभाषा म्हणून नावारूपाला देखील आली. १९९० नंतर झपाट्याने झालेल्या जागतिकीकरणानंतर जग खूप जवळ आले.परस्परांना संपर्क करण्यासाठी इंग्रजी भाषेला प्राधान्य देण्यात आले. त्याचबरोबर एकविसाव्या शतकात स्थानिकतेला प्रत्येक देशाने अस्मिता बनवत आपली मातृभाषा मृतवत होऊ नये ; म्हणून शिक्षण आणि रोजच्या व्यवहारात आपापल्या भाषेला त्या त्या देशाने प्राधान्य दिले. आज २१ व्या शतकात ' मल्टी लैंग्वेज स्किल ' ही संकल्पना जोर धरत आहे. एन. ई. पी.२०२० ( नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ) मध्ये त्याचे प्रतिबिंब आपल्याला पाहायला मिळत आहे. आता येणाऱ्या पिढीला अनेक भाषा शिकाव्या लागणार आहेत. त्यांना आपल्या कौशल्यानुरूप नोकरी ज्या देशात असेल,तेथील भाषा कमीत कमी वेळेत शिकून घ्यावी लागणार आहे.

संस्कार हे शरीर,मन आणि बुद्धी यावर केले जाते.आज २१ व्या शतकात संस्कार देण्याचे काम फक्त पालक, शिक्षक यांच्या कडून घडत नसून प्रसार माध्यमे ही ाजच्या काळात मुख्य 'संस्कार केंद्रे ' बनली आहेत. ' व्हाट्सअप विद्यापीठ' अशा उपरोधक पद्धतीने या समाज माध्यमांना विचारवंत लोक नावं ठेवत आहेत.यामध्ये मोठ्या प्रमाणात तथ्य आहे. कारण ही समाज माध्यमे चुकीचे संस्कार नवीन पिढीवर लावत आहेत. खोट्या गोष्टी रंजक, भडक पद्धतीने मांडल्या जात आहेत.सतत मोबाईल मध्ये तोंड खूपसून बसलेल्या मुलांचे 'ब्रेनरॉट' होत आहे. अशा काळात योग्य संस्कार देण्यासाठी अधिकृतता आवश्यक बनली आहे. त्यामुळे पालक आणि शिक्षकाची भूमिका वाढली आहे.

'संस्कृती' म्हणजे जीवन जगण्याची पद्धत होय. एकविसाव्या शतकात संस्कृती ही अनेक संस्कृतीचे मिश्रण बनत आहे. सकाळी न्याहारीसाठी ब्रेड,बिस्कीट खाणारा भारतीय दुपारी जेवणात भाजी-भाकरी खातो. तोच संध्याकाळी पुन्हा चायनीज,इटालियन किंवा अमेरिकन पिझ्झा बर्गर खाऊन पोट भरतो. अशाप्रकारे आजचा काळ हा मिश्र संस्कृतीचा काळ आहे. हे मिश्रण होत असताना अंतरविरोध, अस्मिता, देशाभिमान,अर्थकारण अशा अनेक बाबींना यामध्ये महत्त्व येत आहे.

तंत्रज्ञानातून समृद्ध आणि स्वयंपूर्ण होणे हा २१ व्या शतकाचा प्रत्येक देशाचा ' सक्सेस फॉर्मुला' ठरणार आहे. शिक्षण, आरोग्य,पायाभूत सुविधा, संशोधन अशा अनेक बाबतीत अभूतपूर्व अशी उत्क्रांती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होत आहे. यातून मानवी जीवन उंचावत आहे. 'आर्टिफिशल इंटेलिजन्सी' चा वापर मानवाच्या सर्व मूलभूत क्षेत्रांना व्यापून टाकत आहे. त्यातून मानवी सर्जनशीलता धोक्यात येत आहे. माणूस आणि तंत्रज्ञान हा संघर्ष एकविसाव्या शतकात उफाळून येणार आहे. येत्या काळात तंत्रज्ञानाचा नैतिकतेने वापर केला जावा, ही मागणी मानवतावादी कार्यकर्त्यांकडून होऊन नव्या चळवळी निर्माण होणार आहेत. युद्धतंत्र पूर्णपणे स्वयंचलित करण्याकडे अनेक देशांचा कल दिसत आहे. मानवी हस्तक्षेपाशिवाय होणारी युद्धे ही किती भयानक पातळीवर लढली जातील ; याचा अंदाज आजच्या घडीला कोणीही बांधू शकत नाही. अशाप्रकारे एकविसावे शतक हे संस्कार,संस्कृती आणि तंत्रज्ञान या सर्व पातळ्यावर आव्हानात्मक असणार आहे.

## ईट येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्रशालेतील
# नवोदय पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार

### पात्र विद्यार्थ्यांना सायकल आणि साहित्याचे वाटप



**आरंभ मराठी । भूम**

पीएम श्री जि.प प्रशाला ईट च्या नवोदय पात्र पाच विद्यार्थ्यांचा ईट गावातील सिद्धेवर मंदिरात शालेय शिक्षण समिती व गावकऱ्यांकडून भव्य सत्कार करण्यात आला. प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी याही वर्षी नवोदय प्रवेश परीक्षेत घवघवीत यश मिळवले. यामध्ये इ. सहावी प्रवेशासाठी गौरी जोतीराम तावरे, श्रेया प्रसाद सातपुते, विराज सोमेश्र्वर स्वामी तसेच अविष्कार सागर खारगे असे चार विद्यार्थी प्रवेश पात्र झाले. तर आठवी मधील श्रेयस चव्हाण हा नवोदय प्रवेशासाठी पात्र ठरला. या सर्वांचा शालेय शिक्षण समिती तर्फे यथोचित सत्कार करण्यात आला. सत्कार सोहळ्या प्रसंगी मुख्याध्यापक जयराम कचरे यांनी प्रत्येकी सात हजार रुपये किंमतीची सायकल स्वखर्चातून पात्र विद्यार्थ्यांना दिल्या. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांनी प्रत्येकी सॅक व सन्मानचिन्ह, जयचंद्र सातपुते यांनी प्रत्येकी स्मार्टवॉच, संगिता देशमुख यांनी प्रत्येकी एक हजार रुपये, नवनाथ बुरुंगे यांनी प्रत्येकी एक हजार रुपये, प्रसाद सातपुते यांनी शालेय दप्तर, जोतीराम तावरे यांनी पाणी बॉटल, अशोक माने यांनी शैक्षणिक साहित्य , इतर अनेक रोख बक्षिसे देऊन विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना पाचवीचे मार्गदर्शक शिक्षका रुपाली गवळी, दत्तात्रय पुरी, बाजीराव कवडे, राहूल सरवदे यांचा पालकातर्फे फेटा, शाल, पुष्पहार तसेच सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच पांडुरंग कवडे यांनी मार्गदर्शक शिक्षकांना रोख बक्षीसे देऊन गौरव केला. आठवीला मार्गदर्शन करणारे गिरीजा गिरी,लक्ष्मीकांत चव्हाण, अश्र्विनी चेडे, सावंत यांचाही या प्रसंगी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गावचे सरपंच संजय आसलकर, प्रताप भैया देशमुख, सोमेश्र्वर स्वामी, सयाजीराजे हुंबे, निलेश चव्हाण, ईश्वर देशमुख, रविराजे देशमुख, प्रवीण देशमुख आबासाहेब हुंबे, इम्रान पठाण, गणेश चव्हाण, अशोक माने,समियोद्दिन काझी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## धार्मिक स्थळांना विशेष संरक्षण द्यावे



### अर्धमसला प्रकरणी मुस्लिम समाजाचे निवेदन

**आरंभ मराठी । धाराशिव**

महाराष्ट्रामध्ये धार्मिक स्थळांवर होणार्या हल्लयांच्या घटनामध्ये वाढ होत आहे. बीड जिल्ह्यातील अर्धमसला गावात मशिदीमध्ये जिलेटीनचा स्फोट घडवून आणल्याच्या घटनेचा निषेध करत महाराष्ट्रातील धार्मिक स्थळांना विशेष संरक्षण द्यावे अशी मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत मंगळवारी (दि.१) मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले. निवेदनात म्हटले की, गेल्या अनेक महिन्यापासून महाराष्ट्रामध्ये अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाला लक्ष्य करुन तसेच समाजाप्रति द्वेषाचे वक्तव्य करुन समाजात विष कालवण्याचा प्रयत्न सुरु आहे. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांचा सुद्धा यामध्ये सहभाग आहे. ही बाब निंदणीय असून त्याचा मुस्लिम समाज निषेध करत आहे. त्याचीच परिणिती म्हणून काही जातीयवादी व्यक्तीनी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील अर्धमसला गावात मशिदीमध्ये स्फोट घडवून आणला. तसेच जालना येथे दर्ग्याची तोडफोड, दर्ग्यावर विशिष्ट झेंडे लावणे, समाजाबद्दल अपशब्द वापरणे असे प्रकार घडत आहेत. समाजामध्ये विष पेरण्याचे काम करणार्यांवर कठोर कारवाई करावी, जेणेकरुन महाराष्ट्रात जातीय शांतता व सलोखा निर्माण राहील, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर मसूद शेख, ॲड. परवेज काझी, कादरखान पठाण, वाजीद पठाण, आयाज शेख, एजाज काझी, ॲड. फेरोज शेख, तौफिक पठाण, अन्वर शेख, खलील पठाण, इरशादअली सय्यद, अफरोज पीरजादे, इस्माईल काझी, बाबा मुजावर, रउल्ला शेख, इम्रान खान, ॲड. जावेद काझी, साबेर सय्यद, अतिक शेख, तौफिक शेख, अल्ताफ शेख, हसीब काझी, बिलाल तांबोळी, महेमूद मुजावर, खलील शेख, इब्राहीम शेख, इस्माईल शेख व इतर समाजबांधवांची स्वाक्षरी आहे.

## गुढीपाडवा प्रवेश वाढवा उपक्रमांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे येरमाळा येथील शाळेत स्वागत

**आरंभ मराठी । येरमाळा**

मराठी नविन वर्षाच्या निमीत्ताने धाराशिव जिल्हयातील जिल्हा परिषद व नगर पालिकांच्या शाळेत इयत्ता पहिलीसह पुढील सर्व वर्गात प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश व्हावेत, एकही विद्यार्थी शाळाबाह्य राहू नये यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने गुढी पाडवा, प्रवेश वाढवा हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाला प्रतिसाद देत येरमाळा येथेही प्रवेश दिंडी घेण्यात आली होती. त्याला प्रतिसाद देत नवीन विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश घेतले. दिनांक १ एप्रिल रोजी जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळेच्या प्रांगणात सर्व पालक, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षण प्रेमी नागरिक यांना बोलावून त्यांच्या उपस्थितीत आपल्या शाळेत प्रवेशित झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा साखरेचा हार, पुष्पहार, फेटा बांधून स्वागत सत्कार करण्यात आले. यावेळी केंद्रप्रमुख अनिल बारकुल, मुख्याध्यापक पडवळ जे.जे. सुनंदा जाधव, मनिषा वाघमारे, शेरखाने दिनेश, देशमुख भारती, कन्या शाळेचे मुख्याध्यापक ठोंबरे एस. पी., वनवे मॅडम, उकिरडे मॅडम, चेचे मॅडम, दिडवळ मॅडम, बारकुल मॅडम, शा.व्यवस्थापन समिती अध्यक्ष विलास बारकुल , पत्रकार मिलींद देशमुख, सर्व पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## माकणी ग्रामपंचायतकडून दिव्यांगाच्या ५% निधीचे वाटप

**आरंभ मराठी । लोहारा**

लोहारा तालुक्यातील माकणी ग्रामपंचायत कडून दिव्यांग निधी वाटप करण्यात आला . ग्रामपंचायतच्या उत्पन्नातुन एकूण ६०९५० रुपयांचा निधी ५३ दिव्यांग लाभार्थीना प्रत्येकी ११५० रुपये हा त्याच्या खात्यात वर्ग करण्यात आला. लोहारा तालुक्यातील माकणी ही पहिली ग्रामपंचायत आहे की त्यांनी दिव्यांग निधी वाटप केला आहे. असाच आदर्श बाकीच्या ग्रामपंचायतींनी घेऊन लवकरात लवकर दिव्यांगाचा ५% निधी वाटप करावा अशी मागणी दिव्यांग बांधवांनी केली आहे. या वेळी माकणीचे सरपंच स्वाती विठ्ठल साठे, ग्रामसेवक प्रदीप जाधव, मोहंमद अत्तार, दिपक आलमले, बाजीराव पाटील, बिरू माने व ग्रामस्थ उपस्थित होते.

# तेर पेठ शाळेत पहिलीच्या वर्गाचा शुभारंभ

**आरंभ मराठी । धाराशिव**



तालुक्यातील तेर येथील पेठ जिल्हा परिषद शाळेत पहिल्या वर्गाचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. जि प चे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांच्या संकल्पनेतून संपूर्ण धाराशिव जिल्ह्यातील जि प शाळेत राबविण्यात येत असलेल्या गुढीपाडवा-प्रवेश वाढवा या अभियान अंतर्गत इयत्ता पहिलीच्या वर्गाचा शुभारंभ करण्यात आला.तसेच पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यामध्ये इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत साखरेचा हार, गुलाबपुष्प, सचित्र बालमित्र हे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले.तसेच शाळेतील पहिलं पाऊल म्हणून विद्यार्थ्यांचे पाऊल घेण्यात आले. पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला होता.तसेच ज्ञानरुपी गुढी उभारण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तेर बीटचे विस्तार अधिकारी मधुकर तोडकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच दीदी काळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सचिन देवकते, केंद्रप्रमुख अनिल पडवळ, ग्रामपंचायत सदस्य अजित कदम,शाळा व्यवस्थापन सदस्या पुष्पा झिंजे, माधवी लकडे, वैष्णवी पाडुळे, ज्योती जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापिका सुलभा पवार यांनी प्रास्ताविकात शाळेतील उपक्रमांची माहिती दिली. अध्यक्ष सचिन देवकते, विस्तार अधिकारी तोडकर यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांचे महत्त्व उपस्थित पालकांना पटवून दिले. शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष देशपांडे यांनी गुढी पाडवा-प्रवेश वाढवा हे अभियान राबवण्यामागील उद्देश व महत्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणपती यरकळ तर आभार प्रदर्शन शशिकांत देशमुख यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका सुलभा पवार संतोष देशपांडे, गणपती यरकळ, शशिकांत देशमुख, गोरख चौरे, चंद्रकांत गिरे, उषा नाईक,वर्षा शेजाळ, प्रभावती मुंढे, लता बंडगर, रोहिणी हलसीकर,शकुंतला पांचाळ यांनी प्रयत्न केले.

## शासकीय रुग्णालयात मतिमंद रुग्णांना आवश्यक असलेल्या गोळ्या मिळत नसल्याची तक्रार

**आरंभ मराठी । नारंगवाडी**

धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात, उपजिल्हा रुग्णालयात तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात मतिमंद रुग्णांना आवश्यक असणाऱ्या गोळ्यांचा पुरवठा केला जातो. परंतु, उमरगा तालुक्यातील नाईचाकूर प्राथमिक आरोग्य केंद्रात या गोळ्या मिळत नसल्यामुळे मतिमंद रुग्णांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे हाल होत असल्याची तक्रार कुटुंबीयांनी केली आहे. गेल्या एक महिन्यापासून या गोळ्या मिळत नसल्याची तक्रार केली आहे. यासंदर्भात नाईचाकूर प्राथमिक आरोग्य केंद्र येथील कर्मचारी डॉ. स्वाती चव्हाण यांना विचारल्यास गोळ्या कुठेही उपलब्ध नाही असे उत्तर त्यांनी दिले. रुग्णास गोळ्या नसल्यास होणार्या त्रासास जबाबदार कोण असा प्रश्र्न विचारला जात आहे. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रांसह सर्व शासकीय रुग्णालयात या गोळ्या उपलब्ध करून घ्याव्यात अशी मागणी केली जात आहे. तसेच याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन या संदर्भात पाठपुरावा करावा अशीही मागणी नागरिकांनी केली आहे.

## तुगांव जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा



**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तुगांव येथे मंगळवारी (दि.४) शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी इयत्ता पहिलीसाठी प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे शाळेत पुष्पगुछ, फुगे, टोप्या आणि चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. मागील आठवड्यात शाळेतील शिक्षकांनी गावात घरोघरी जाऊन प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण केले होते. त्यानुसार एकूण २५ विद्यार्थी प्रवेशपात्र असल्याचे निश्र्चित झाले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यासह पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून तुगांवच्या सरपंच कोमल किशोर शेंडगे, शाळा व्यस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र डोंगरे आणि अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद अनपट उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक नामदेव डुकरे, तर सूत्रसंचालन दत्तात्रय पडवळ यांनी केले. शिक्षक सुलभकुमार भगत यांनी शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाईल असे आश्र्वासित केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक नवनाथ बचाटे, अमोल वैद्य यांचे योगदान लाभले. जिल्हा परिषद शाळेचा दर्जा दिवसेंदिवस उंचावत असून जिल्हा परिषद स्मार्ट स्कूल सारखे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे असे प्रतिपादन शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद अनपट यांनी व्यक्त केले. गुढी पाडवा, गुणवत्ता वाढवा या स्लोगनला प्रतिसाद देताना नागरिकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश हा जि.प. शाळेमध्ये प्रवेश घेऊन प्रगती साधावी असे आवाहन शिक्षक शिवदास चौगुले यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा, प्रिती हाजगुडे सदस्य, सचिन लोमटे, मीरा शितोळे, अंगणवाडीताई जानका भुतेकर, रेश्मा भुतेकर व विद्यार्थ्यांसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेलगाव जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे भव्य दिव्य स्वागत

### सजवलेल्या बैलगाडीतून मिरवणूक

**आरंभ मराठी । धाराशिव**





कळंब तालुक्यातील शेलगाव (जहागीर) येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिलीच्या विद्यार्थ्यांचे भव्य दिव्य स्वागत करण्यात आले. सजवलेल्या बैलगाडीतून विद्यार्थ्यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली.या स्वागताने नवागत विद्यार्थी भारावून गेले होते.

गुढी पाडवा प्रवेश वाढवा, या कळंब तालुक्याच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाअंतर्गत शेलगाव शाळेत पुढील वर्षीच्या इयत्ता १ ली प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश घेऊन त्यांना खोबऱ्याचे व साखराचे हार घालून, औक्षण, गंध, अक्षता लावले. फुगे , चॉकलेट, बिस्कीट, गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. मुलींची सजवलेल्या बैलगाडीत व मुलांची कारमध्ये प्रभातफेरी काढण्यात आली. कार्यक्रमासाठी गावातील सरपंच, शालेय समिती अध्यक्ष, सदस्य व पालक उपस्थित होते. यासाठी सुलतान काझी यांनी आपली बैलगाडी सजवून आणली तसेच मुबारक काझी यांचे दोन्ही जावई - गणी सय्यद व खलील शेख यांनी आपल्या सासरवाडीच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्वतः वेळ देऊन बैलगाडी सजवली आणि प्रभातफेरी होईपर्यंत या चिमुकल्यांच्या शैक्षणिक आरंभाच्या रथाचे सारथ्य केले. शाळेकडून त्यांचे विशेष आभार मानण्यात आले. यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःची ओळख स्वतः करून दिली. नवीन प्रवेशित विद्यार्थी व एकूणच शाळेतील विद्यार्थी, शिक्षक,पालक अगदी उत्साहात होते. शाळेचे मुख्याध्यापक मुंडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कदम मॅडम यांनी पुढील शैक्षणिक वर्षापासून अंगणवाडी आणि इयत्ता पहिलीपासून उइइए पॅटर्न सुरू होणार आहे ही आनंदाची बातमी पालक व विद्यार्थीना दिली. तसेच शाळेतील शिक्षिकांनी माता पालकांचे स्वागत केले.श्री. विभूते यांनी आभार मानले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

## विविध वृत्त...

### तुळजापूर येथील नवोदय विद्यालयात गुढी उभारून केले नववर्षाचे स्वागत



**आरंभ मराठी । तुळजापूर**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात हिंदू नववर्षाचा पहिला दिवस म्हणून रविवारी (दि.३०) गुढी उभारून नववर्षाचे स्वागत करण्यात आले. सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य के वाय इंगळे यांच्या हस्ते गुढी उभा करून हिंदू संस्कृती प्रमाणे विधिवत पूजा अर्चा करण्यात आली. याप्रसंगी सचिन खोब्रागडे, हरी जाधव, वाय आर पाटील, टी ए काळे, प्रमोद खरबास, बसवराज कोरकर, विद्या जाधव ,आर एम अलसेट, इंदू हुडा, वैभव कुलकर्णी, एम पी कुलकर्णी हे उपस्थित होते. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षकवृंद यांची उपस्थिती होती. प्राचार्य के वाय इंगळे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, हिंदू नववर्षाचा प्रारंभ आज पासून झाला. तसेच ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती आजच केली. तसेच श्रीरामाने लंकेवर विजय प्राप्त करून परत आयोध्येत आल्यानंतर त्यांचे स्वागत याच दिवशी मोठ्या जल्लोषाने केले. आजचा दिवस साडेतीन मुहूर्तापैकी एक उत्तम मुहूर्त असून चांगला संकल्प करण्याचा, चांगले कार्य हाती घेण्याचा हा शुभ दिवस दिवस आहे. हा कालावधी वसंत ऋतुच्या आगमनाचा असून यावेळी झाडांना नवी पालवी फुटलेली असते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक कार्यक्रम प्रभारी एच. जी जाधव यांनी केले.

### हंगरगा नळ येथे किरकोळ कारणावरून जमावाची एकास बेदम मारहाण

**आरंभ मराठी । नळदुर्ग**

तुळजापूर तालुक्यातील हंगरगा नळ येथे किरकोळ कारणावरून वाद होऊन जमावाने एकास बेदम मारहाण केल्याची घटना घडली. यातील आरोपी रेहान नुर अहमद मुंगे, अल्ताफ नुरअहमद मुंगे, बिलाल महमद अली पठाण, जावेद इब्राहिम मुंगे, समीर खासीम शेख (सर्व, रा. हंगरगा नळ ता. तुळजापूर) यांनी दिनांक ३१ मार्च रोजी राम वसंत चव्हाण यांच्या घरासमोर हंगरगा नळ फिर्यादी गणेश दिलीप चव्हाण (वय २७ वर्षे, रा. हंगरगा) यांना रस्त्याच्या खाली सरक का म्हणाला या कारणावरुन गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्यांनी, दगडाने मारहाण करुन जखमी केले व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. गणेश चव्हाण यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ११८(१),११५(२), ३५२, ३५१(२),१८९(२), १९१(२), १९१(३), १९० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### साहित्यिक युवराज नळे यांचा युवा साहित्य समूहाकडून सत्कार



**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव येथील साहित्यिक युवराज नळे यांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय वाङ्मय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल युवा साहित्य समुहाकडुन त्यांचा सत्कार करण्यात आला. मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर हैदराबाद मुक्तिसंग्राम मधील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान अधोरेखित करणारी साहित्यिक युवराज नळे यांची संशोधन पर साहित्यकृती 'मराठवाडा नव्हे, भारत मुक्तिसंग्राम' या ग्रंथास पुणे येथील मातंग साहित्य परिषद तर्फे उत्कृष्ट साहित्यकृतीसाठी दिला जाणारा २०२५ चा मानाचा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय वाङ्मय पुरस्कार जाहीर करण्यात आला. सदरील पुरस्काराचे वितरण दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे, पुरस्कार मिळाल्याबद्दल युवा साहित्य समुहाकडुन गणेश वाघमारे,युसूफ सय्यद, बालाजी यावलकर यांच्याकडून अभिनंदन व सत्कार करण्यात आला.

### तुगांवचा आदर्श सचिन लोमटे NMMS शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात तिसरा

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील तुगाव येथील आदर्श सचिन लोमटे याने राष्ट्रीय अर्थसहाय्यक गुणवत्ता शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले आहे. लालबहादूर शास्त्री विद्यानिकेतन, खेड येथून शिक्षण घेत असलेल्या आदर्शने इयत्ता आठवी NMMS शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. विशेष म्हणजे, आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या प्रवर्गातून (EWS) त्याने संपूर्ण जिल्ह्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. आदर्श याने या परीक्षेत एकूण ११२ गुण मिळवले आहेत. मंगळवारी जाहीर झालेल्या जिल्हा गुणवत्ता यादीत त्याने आपल्या नावाची नोंद केली असून, या परीक्षेत मिळवलेल्या उल्लेखनीय यशामुळे त्याला शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. याच्या अगोदर देखील पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये येण्याचा मान त्याने मिळवला होता. तीच यशाची परंपरा कायम ठेवत उत्तुंग यश त्याने संपादन केले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याला ग्रामस्थ, शिक्षक, पालक, आणि शिक्षण संस्थेच्या वतीने भरभरून शुभेच्छा देऊन कौतुक केले जात आहे. NMMS परीक्षा ही राष्ट्रीय स्तरावरील महत्वाची परीक्षा असून, ती होतकरू आणि हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या स्वरूपात मदत करते. आदर्शच्या यशाचे श्रेय त्याच्या आई-वडिलांच्या प्रोत्साहनाला, शिक्षकांच्या मार्गदर्शनाला आणि त्याच्या अथक परिश्रमाला जाते. शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी आदर्शच्या यशाचे कौतुक करत भविष्यातील यशासाठी त्याला शुभेच्छा दिल्या.



# पाथरूड येथील सरकारी दवाखान्याकडे जाणारी वाट 'बिकट'

## ■ दवाखाना गाठण्यासाठी रुग्णांना करावी लागते कसरत ■ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनास्थेमुळे मंजूर झालेल्या रस्त्याचे काम रखडले

**समाधान बोराडे । आरंभ मराठी**

**पाथरूड : पाथरूड आरोग्य केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, रुग्णांना दवाखाना गाठण्यासाठी मोठी कसरत करत त्या रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. माजी सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी या रस्त्याच्या कामासाठी प्रयत्न करून निधी उपलब्ध करून दिला. परंतु, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनास्थेमुळे या रस्त्याचे काम होत नसल्याचे दिसत आहे. त्यातच आमदार डॉ. तानाजीराव सावंत हे विधानसभा निवडणुकीनंतर गेल्या चार महिन्यात मतदारसंघात एकदाही न फिरकल्यामुळे बांधकाम विभागावर कोणाचा वचक राहिलेला नाही.**

तत्कालीन आरोग्यमंत्री डॉ. तानाजीराव सावंत पाथरूडच्या आरोग्य केंद्रास भेट देण्याकरिता आले असता दवाखान्यामध्ये जाण्यासाठी खराब रोड असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ निधी मंजूर करून रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यास सांगितले होते. प्राथमिक आरोग्य केंद्राकडे नागरिकांना ये जा करण्यासाठी त्रास होऊ नये या उद्देशाने हे रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना सावंत यांच्या कडून देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने सहा महिन्यापूर्वी दिवाळीच्या पाडव्याच्या शुभमुहूर्तावर मध्यम स्थितीत असलेला बागलवाडी पाथरूड एक किलोमीटर रोड पूर्णपणे उकरण्यात आला होता. स्थानिक शेतकऱ्यांसोबत रस्त्यावर पूल करण्याच्या कारणावरून शाब्दिक बाचाबाची झाल्यामुळे मागील सहा महिन्यापासून या रस्त्याचे काम रखडले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून शेतकरी, गुत्तेदार व प्रशासनाकडून दोन वेळेला संवाद साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु त्यात अपयश आल्यामुळे रोड आहे त्या परिस्थितीत आहे. याचा फटका सर्वसामान्य पाथरूड आणि बागलवाडीतील येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना, वैजनाथ मंदिरामध्ये जाणाऱ्या भाविकांना तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जाणाऱ्या रुग्णांना बसत आहे. मंगळवारी झालेल्या पावसामुळे चार ते पाच गाड्या या रस्त्यावरून घसरून पडल्या आहेत. त्यामध्ये दोघेजण किरकोळ जखमी झाले आहेत. बांधकाम विभागाने यावर तातडीने मार्ग काढून रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरू करावे अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.



### अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या चुकीच्या धोरणामुळे सरकारी दवाखान्यांमध्ये येणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ रस्त्याचे काम हाती घ्यावे अन्यथा प्रशासनाला निवेदन देऊन रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल.

**-मनोज पवार**
**पाथरूड ग्रामस्थ.**

### पोलीस संरक्षण दिल्यास पाच दिवसात काम पूर्ण करणार

सहा महिन्यापूर्वी दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर कामाला सुरुवात करण्यात आली होती. परंतु स्थानिक शेतकऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे रस्त्याचे काम बंद पडले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने पोलीस संरक्षण उपलब्ध करून दिल्यास पाच दिवसांमध्ये काम पूर्ण करून घेण्यात येईल.

**- प्रताप भोईटे**
**गुत्तेदार, भोईटे कंट्रक्शन.**

पाथरूड मधील आरोग्य केंद्राकडे जाणाऱ्या रोडच्या संदर्भात गुत्तेदारास तातडीने काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. लोकांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन लवकरच काम पूर्ण केले जाईल.

**-गिराम**
**उपविभागीय अभियंता, भूम.**

## जिल्हा परिषद शिवशक्तीनगर शाळेत 'गुढी पाडवा प्रवेश वाढवा' उपक्रम

**आरंभ मराठी । वाशी**

वाशी शहरातील पीएमश्री शिवशक्तीनगर शाळेत मंगळवारी (दि.१) 'गुढी पाडवा प्रवेश वाढवा' या उपक्रमांतर्गत प्रवेशोत्सव कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी नवीन पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत साखरेचा हार, जादुई टोपी, गुलाबपुष्प देऊन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका अनुराधा देवळे तर प्रमुख पाहुणे म्हणून जाणीव संघटनेचे रामभाऊ लगाडे उपस्थित होते. शाळेत सीबीएसई अभ्यासक्रम इयत्ता पहिलीपासून सुरू होणार असून सर्व शैक्षणिक साहित्य उपलब्ध , पीएमश्री योजनेतील निवड झालेली ही शाळा आहे. शाळेत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके,गणवेश व इतर योजना या शाळेत राबविण्यात येत आहेत. तसेच सुसज्ज इमारत, प्रत्येक वर्गात भौतिक व शैक्षणिक सुविधा शाळेत उपलब्ध करून देण्यात आल्याचे मुख्याध्यापिका देवळे यांनी यावेळी बोलताना सांगितले. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा धनश्री चेडे, उपाध्यक्ष बाळासाहेब राऊत, अंगणवाडी शिक्षिका यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.




## उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन

**आरंभ मराठी । उमरगा**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या वतीने 'लिटरेचर अँड मॉरल व्हॅल्यूज' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम (दि. २ एप्रिल) रोजी करिअर कट्टा हॉलमध्ये करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. इंग्रजी विभागाच्या वतीने दरवर्षी निबंध स्पर्धेचे आयोजन केले जाते. यावर्षी या स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ असे बक्षीसाचे स्वरूप होते. यावर्षीच्या निबंध स्पर्धेत येवते तृप्ती दयानंद (प्रथम), माळी अमृता संतोष (द्वितीय), घोडके साक्षी संजय (तृतीय) आणि चव्हाण प्रज्वल तात्याराव (उत्तेजनार्थ) यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी उपस्थित स्पर्धकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर बोलताना अस्वले यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात आयोजित केल्या जाणाऱ्या प्रत्येक स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेण्याविषयी आवाहन केले.

या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. विलास इंगळे (उपप्राचार्य, विज्ञान शाखा), प्रा.डॉ. पिठले (उपप्राचार्य, कला शाखा), डॉ. एस.डी. मुंगळे, डॉ. सी. डी. करे , डॉ. संतोष सुरवसे, डॉ. बी. ए. शेळके, डॉ. पसरकल्ले व तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. ए. डी. देशमुख व आभार प्रा. डॉ. एस. टी तोडकर यांनी मानले.

## कृषी महाविद्यालयातील सात विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्यूमध्ये निवड




**आरंभ मराठी । धाराशिव**

व्ही.पी.एज्युकेशनल कॅम्पसमधील कृषी महाविद्यालयात झायडेक्स बायोफर्टीलायझर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा कॅम्पस इंटरव्यू कार्यक्रम पार पडला. सदर निवड प्रक्रियेमध्ये महाविद्यालयाच्या अंतिम सत्रातील एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.या विद्यार्थ्यांमधून अंतिम सात विद्यार्थ्यांची निवड कंपनीच्या निवड समितीने केली. झायडेक्स बायोफर्टीलायझर प्रायव्हेट लिमिटेड ही जैविक कृषी निवेष्ठा उत्पादने आधारित अग्रगण्य कंपनी असून, जैविक खत निर्मितीमध्ये मोलाची कामगिरी बजावत आहे.सध्याच्या बेरोजगारीच्या काळामध्ये महाविद्यालयाच्या अथक पाठपुराव्यातून झायडेक्स बायो फर्टीलायझर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी आमंत्रित करण्यात आले होते. कंपनीच्या कॅम्पस इंटरव्यूमध्ये राऊत रवींद्र,बाराते,सुनील, इंगळे यशोदीप, गव्हाणे चंद्रकांत,जाधव अजय,देशमुख पार्थ, देशमुख अभिषेक या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.सदरील निवड झालेले विद्यार्थी हे महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांच्या कंपनीच्या कार्यक्षेत्रात कंपनीचे कृषी क्षेत्र संलग्न काम पाहणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी एक सक्षम रोजगार मिळवून देण्याचा उत्तम प्रयत्न महाविद्यालयाने सदरील उपक्रमातून दर्शविला आहे. कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.भविष्यामध्ये कृषी क्षेत्रातील विविध नामांकित कंपन्या तसेच कृषी आधारित उद्योग यामध्ये महाविद्यालयाचे जास्तीत जास्त विद्यार्थी कसे निवडले जातील, यासाठी जास्तीत जास्त कृषी औद्योगिक कंपन्यांना कॅम्पस प्लेसमेंट साठी आमंत्रित करण्याचे त्यांनी आश्र्वासन विद्यार्थ्यांना दिले.

सदरील कॅम्पस प्लेसमेंट यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिसिंह पाटील, महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्राध्यापक हरी घाडगे, प्लेसमेंट सेल प्रमुख डॉ. शेख मोहसीन,डॉ. गांधले अमित, डॉ. इंगळे रोहित, डॉ. खोसे प्रताप, प्रा. सुमिथा पाटील, प्रा. दळवे सतेश, प्रा. डोके आकाश, प्रा. माळी प्रवीण, प्रा. शेटे देवानंद, प्रा. भालेकर सुनील, प्रा. शिंदे अक्षय, प्रा. मुंडे नवनाथ, प्रा. गोटे प्रिया, प्रा. नागरगोजे विजय, श्री. सुतार रामचंद्र, श्री. मुजावर गुलाब, श्री.गिरी ओंकार यांनी मोलाची भूमिका बजावली.

## एन.एम.एम.एस.परीक्षेत सावरगाव प्रशालेचे यश

**आरंभ मराठी । तुळजापूर**

जिल्हा परिषद प्रशाला सावरगाव (ता.तुळजापूर) ही प्रशाला तुळजापूर तालुक्यात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा म्हणून प्रसिद्ध आहे. २०१०-११ पासून दरवर्षी सावरगाव प्रशालेचे विद्यार्थी NMMS परीक्षेत घवघवीत यश मिळवत असतात.हीच यशाची परंपरा या वर्षीही कायम ठेवण्यात प्रशालेला यश मिळाले आहे.या प्रशालेचे ४ विद्यार्थी NMMS धारक व ३ विद्यार्थी NMMS सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. असे यश मिळवणारी ही तालुक्यातील एकमेव प्रशाला आहे. प्रशालेतील श्रावणी कानिफनाथ माळी, आदिती परमेश्वर पाटील,पृथ्वीराज महादेव कुंभार, अमृता दत्ता डोके हे चार विद्यार्थी एन.एम.एम.एस धारक झाले आहेत.तसेच ज्ञानेश्वरी गणपत शिंदे, समृध्दी माणिक करंडे, रोहीत रामदास बोबडे हे ३ विद्यार्थी NMMS सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीतर्फे सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी काटीचे केंद्रांचे केंद्रप्रमुख हणमंत कदम,शाळेचे मुख्याध्यापक संदीप वाघ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अतुल पवार, माजी अध्यक्ष रामराजे पाटील, अमोल काळदाते,सुनील शिंदे, गोकुळ शिंदे, कानिफनाथ माळी, कृष्णात डोके, रंगनाथ डोलारे,अण्णासाहेब भालेकर,रामेश्वर माळी,प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री.शेडूळे, कन्या प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कुंभार,शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, सर्व शिक्षक, पालक, ग्रामस्थ यांनी उपस्थित राहून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.




# प्रा.वसंत हंकारे यांच्या न समजलेले आईबाप व्याख्यानाच्या कार्यक्रमास मुरुडकरांचा प्रतिसाद

**डॉल्बीला फाटा देऊन वैचारिक प्रबोधन करणाऱ्या उपक्रमांचे यशस्वी आयोजन**

**आरंभ मराठी । मुरुड**

मुरुड येथे श्रीराम नवमी निमित्त गुढीपाडव्याच्या दिवशी श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने प्रा.वसंत हंकारे यांचे न समजलेले आईबाप या विषयावर मुरुड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक स्टेज या ठिकाणी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास शहरातील पालक, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण नागनाथ बचाटे यांनी केले.

याप्रसंगी त्यांनी सांगितले की, प्रतिवर्षी रामनवमीनिमित्त प्रभू रामचंद्रांची मिरवणूक काढली जाते. दिवसेंदिवस मिरवणुकीचे स्वरूप बदलत चालले आहे. डॉल्बी डीजे लावून अश्लील गाणी वाजवणे व तरुणांनी नशा करून बीभत्स नृत्य करणे, मिरवणुकीत लावलेल्या डीजेमुळे लहान मुलं, वृद्ध, आजारी हृदयरोग रुग्ण यांना त्रास देण्यापेक्षा मिरवणूक रद्द करून समाजाला योग्य दिशा देणारा प्रेरणादायी कार्यक्रम घ्यायचा निश्चय समितीने केला. प्रा. वसंत हंकारे यांनी त्यांच्या उत्तम भाषण शैलीने दीड तास हजारो उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू तरळत ठेवले. कोवळ्या वयात चुकीच्या मार्गावर मार्गक्रमण करणाऱ्या तरुणांना व मुलींना आई-वडिलांचे महत्त्व विशद करून सांगितले. तसेच प्रेम वासना अशा प्रकाराला बळी न पडता उच्चशिक्षित होऊन यशस्वी जीवन जगण्याचा कानमंत्र त्यांनी दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागनाथ बचाटे यांनी सूत्रसंचालन रामकृष्ण देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशाल नागटिळक, अमित कांकरिया, राजेश मुथ्था, भैरवनाथ पिंपरे, महेंद्रसिंग तिवारी व समस्थ रामभक्त मुरुडकरांनी सहकार्य केले.



# पोकरा प्रकल्पाच्या नोंदणीची वेबसाईट अजूनही सुरू होईना

## ■ गावांची निवड होऊन सहा महिने झाले तरी योजनेला गती मिळेना
## ■ जिल्ह्यातील १३८ गावातील शेतकऱ्यांना योजनेच्या अंमलबजावणीची प्रतीक्षा




सुभाष कुलकर्णी/आरंभ मराठी

**तेर : नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील गावांची निवड होऊन सहा महिने उलटून गेले तरीही या योजनेचा शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी अद्याप पर्यंत वेबसाईट सुरू झाली नाही. त्यामुळे दुसऱ्या टप्प्याच्या गावातील शेतकऱ्यांकडून पोकरा प्रकल्पातून शेती विकासाला चालना कशी मिळेल असा सवाल उपस्थित केला जात आहे. धाराशिव जिल्ह्यातील १३८ गावांची निवड या योजनेसाठी झाली आहे. परंतु, प्रत्यक्ष योजनेच्या कामांना अजूनही सुरुवात झाली नसल्यामुळे शेतकरी प्रतीक्षेत आहेत.**

मागील वर्षी वर्षांपासून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प या योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला आहे. शेतकऱ्यांना या योजनेमुळे आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून शेती करण्याचे बळ या योजनेतून मिळाले. या योजनेचहा दुसरा टप्पा राबवताना धाराशिव जिल्ह्यातील १३८ गावांची योजनेत निवड झाली आहे. या योजनेत अल्पभूधारक शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे ओढावणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी संशोधन, शेती उत्पादकता वाढविणे, पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी तुषार संच, ठिबक संच वापर, शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या मालावर प्रक्रिया करून धान्य साठवणूक करण्यासाठी गोडावून उभारणे यावर प्रामुख्याने भर दिला जातो. पोकरा अंतर्गत तुषार संच, ठिबक संच पाईप, कुक्कुटपालन, विहीर पुर्नभरण, मत्स्यव्यवसाय, हरीतगृह उभारणे, गांडूळ खत निर्मिती, शेततळे बी.बी.एफ.पेरणी यंत्र, बांबू लागवड, वृक्ष लागवड, फळबाग लागवड या बाबींचा समावेश आहे. यासाठी शासनाकडून या योजनेतून अनुदान मिळणार आहे. परंतु, या योजनेची घोषणा होऊन सहा महिने उलटून गेले तरीही अजूनही योजनेची वेबसाईट सुरू झाली नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. त्यामुळे या योजनेत शेतकऱ्यांना अर्ज दाखल करता येत नाहीत.

### पोकरा योजनेसाठी कृषी सहायक आणि सरपंच यांचे प्रशिक्षण पूर्ण



धाराशिव जिल्ह्यातील १३८ गावात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे काम मागेच सुरू झालेले आहे. जी गावे निवडली आहेत त्या गावातील कृषी सहायक, सरपंच, तसेच प्रत्येक गावातील ४ स्वयंसेवक आणि प्रत्येक गावातील एक कृषीताई यांना योजनेसाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण दिले आहे. धाराशिव तालुक्यातील उपळे (मा.) या गावात आणि उमरगा तालुक्यातील एका गावात सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करण्याचे काम देखील झाले आहे. त्यानुसार निवड झालेल्या गावातील सरपंच, कृषी सहायक यांनी या गावांना भेटी देऊन आपापल्या गावांचा नियोजन आराखडा तयार करायचा आहे. योजनेच्या नियोजनासंदर्भात ही कामे एप्रिल आणि मे महिन्यात पूर्ण होतील आणि जून महिन्यापासून या योजनेला जिल्ह्यात गती येणार आहे. पोकरा च्या माध्यमातून शेतीचा आणि शेतकऱ्यांचा विकास करण्यासाठी कृषी विभाग सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

**–रविंद्र माने**
**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धाराशिव.**

### धाराशिव तालुक्यातील २४ गावातील शेतकरी प्रतीक्षेत

या योजनेसाठी धाराशिव तालुक्यातील तेर, तडवळा, पळसप, उपळा या मोठ्या गावांसह गोपाळवाडी, दुधगाव, खामगाव, खेड, घोगरेवाडी, भिकारसारोळा, मोहतरवाडी, पानवाडी, जहागीरदारवाडी, शिंगोली,वरूडा, हिंगळजवाडी,डकवाडी, रामवाडी, कोळेवाडी, वाणेवाडी, इर्ला, भडाचवाडी, आळणी व कुमाळवाडी या २४ गावांची निवड पोकरा योजनेत करण्यात आली आहे. या गावातील शेतकरी योजनेची अंमलबजावणी नेमकी कधी होते याच्या प्रतीक्षेत आहेत.

### वेबसाईट सुरू नसल्यामुळे निराशा

या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना भरपूर सवलत दिली जाते. शेतकऱ्यांना काही शेती विषयक निगडित आर्थिक मदत करून प्रगतशील बनवण्यासाठीचा शासनाचा प्रयत्न आहे. परंतू वेबसाईट सुरू झाली नसल्याने शेतकऱ्यांना या योजनेचे अर्ज दाखल करता येत नाहीत. काही शेतकरी दररोज वेबसाईटला भेट देऊन योजने संदर्भात माहिती घेण्याचा प्रयत्न करतात परंतु, वेबसाईट सुरू नसल्यामुळे शेतकरी निराश होत आहेत.

### साईट लवकर सुरू करावी



शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या आधार व्हावा म्हणून सुरू केलेली पोकरा योजना ही शेतकऱ्यांच्या विकासाला चालना देणारी आहे. परंतु, योजनेची साईट बंद असल्याने शेतकऱ्यांना शेतीविषयक औजारे बाजारातून खरेदी करावी लागत आहेत. शासनाने योजनेची ऑनलाईन साईटट तातडीने सुरू करून शेतकऱ्यांना आधार द्यावा.

**–सतीश कानडे**
**शेतकरी, हिंगळजवाडी.**

### सहा महिने झाले तरी योजनेची अंमलबजावणी का नाही



पोकरा योजनेत तेर गावाचा समावेश होऊन सहा महिने झाले. परंतु, अजूनही शेतकऱ्यांना याचा लाभ घेता आलेला नाही. पोकरा प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. परंतु, अजूनही ऑनलाईन नोंदणी सुरू झाली नसल्याने शेतकऱ्यांना शेतीविषयक योजनांचा लाभ घेता येत नाही. ही योजना लवकर सुरू करण्यात यावी.

**–धनंजय जाधव**
**शेतकरी, तेर.**

# आगामी निवडणुकीसाठी कामाला लागा

### माजी मंत्री राजेश टोपे यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

आरंभ मराठी । धाराशिव

एका निवडणूकीच्या पराभवाने ना उमेद होवू नका, पक्षातून बाहेर गेलेले कावळे सोडून द्या, राहिलेल्या मावळ्यांनी पक्षासाठी एकजुकीने काम करावे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा काम करणा-या कार्यकर्त्यांची दखल घेणारा पक्ष आहे. असे सांगून लोकांच्या प्रश्नाबाबत जागरत राहुन शासनाच्या योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचवाव्या, त्याविरुध्द आवाज उठवावा, येवू घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणूकीसाठी आतापासून कामाला लागावे, असे आवाहन राष्ट्रवादी शदचंद्र पवार पक्षाचे मराठवाडा निरीक्षक तथा माजी मंत्री राजेश टोपे यांनी केले आहे.







येथील पक्षाच्या जिल्हा कार्यालयात जिल्हा कार्यकर्ता आढावा बैठक मंगळवारी (दि.१) पार पडली. या बैठकीत ते बोलत होते. यावेळी माजी आमदार राहुल मोटे, ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे, संजय निंबाळकर, जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर, आदींची उपस्थिती होती. यावेळी माजी आमदार राहुल मोटे, ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे, संजय निंबाळकर यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष श्री. दुधगावकर यांनी एक वर्षे केलेल्या कामाचा आढावा सांगितला. तर स्वागत प्रकाश मुंदडा यांनी केले. आभार सुरेश टेकाळे यांनी मानले. याप्रसंगी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष मधुकर मोटे, भालचंद्र बिराजदार, भास्कर शिंदे, तालुकाध्यक्ष नरदेव कदम, हनुमंत पाटुळे, संजय पवार, दिलीप घोलप, ॲड संदीप पाटील, श्रीधर पवार, राम घोगरे, मुसद्दीक काझी, भारत शिंदे, बाळासाहेब कथले, शेखर घोडके, मसुद शेख, सुदन पाटील, विठ्ठल माने, मनिषा राखुंडे, राहुल बनसोडे, प्रकाश मुंदडा, शामराव पाटील, इकबाल पटेल, अनिल जाधव, नामदेव चव्हाण, श्रीहरी नाईकवाडे, रणजित वरपे, मनोहर हारकर, रमेश देशमुख, सुनंदाताई भोसले, नशिरशहा बर्फीवाले, श्री वाघमारे, नंदकुमार शिंदे, महादेव खेरे, ॲड देवकते, नानासाहेब जमदाडे, गणेश गडकर, बाळासाहेब कणसे, किशोर आवाड, बबन काळदाते, राजेंद्र कदम, कमलाकर, सरवदे, खराडे आप्पा, अमर गुंड, औदुंबर धोंगडे, धनंजय भुतेकर, गणेश धाबेकर, राहुल धाबेकर, अक्षय धाबेकर, वामन हगारे, आत्माराम बिक्कड, साहेबराव गोरे, दौलत गाढवे आदी पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकाची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# येरमाळा येथील आरोग्य केंद्राला जिल्हाधिकाऱ्यांची भेट




### परिसरातील स्वच्छतेबद्दल आरोग्य केंद्राचे केले कौतुक

आरंभ मराठी । येरमाळा

जिल्हा आरोग्य विभागात बाह्यरुग्ण सेवेत सर्वोत्कृष्ठ सुविधा देणारे प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणुन येरमाळा प्राथमिक केंद्राची ओळख आहे. नुकतेच या आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता (एनक्युएएस) पडताळणीत मानांकन मिळाल्याने या आरोग्य केंद्राच्या पाहणीसाठी श्री येडेश्वरी देवी चैत्र पौर्णिमा यात्रेच्या आढावा बैठकीला आलेले जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव,जिल्हा वैद्यकीय डॉ. मिटकरी,तालुका आरोग्य अधिकारी सय्यद उपस्थित होते. वैद्यकीय अधिकारी डॉ.सुधाकर बिरादार आरोग्य कर्मचाऱ्यांनी आरोग्य केंद्रात दिल्या जाणाऱ्या प्राथमिक,अंतररुग्ण,बाह्यरुग्नांवर केले जाणारी उपचार पद्धती,शस्त्रक्रिया विभाग,प्रसूती विभाग,प्रयोग शाळा, आरोग्य केंद्रा अंतर्गत राबविले जाणारे राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम,सामान्य प्रशासन यांची माहिती जिल्हाधिकारी पुजार यांना दिली.आरोग्य केंद्रातर्गत दिल्या जाणाऱ्या सुविधेसह प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारातील स्वच्छता यांची पाहणी केल्या नंतर जिल्हाधिकारी यांनी कर्मचाऱ्यांचे परिसर स्वच्छते बाबत विशेष कौतुक केले. येरमाळा प्राथमिक आरोग्य केंद्राची ३ व ४ जुनला राष्ट्रीय गुणवत्ता आश्र्वासन मानके (एनक्युएएस) कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय कमिटीच्या दोन मूल्यांकन अधिकारी यांनी भेटी देऊन पाहणी केली होती. यावेळी पडताळणी करण्यात आलेल्या आरोग्य केंद्रातील सहा आरोग्य सुविधांना राष्ट्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे राष्ट्रीय गुणवत्ता आश्र्वासन मानके विभागाचे मानांकन मिळाले आहे.आरोग्य केंद्राला ३ जुलैला प्रमाणपत्र देण्यात आले आहे. येरमाळा प्राथमिक आरोग्य केंद्राची राज्य गुणवत्ता पडताळणीतही चार सेवा तपासल्या गेल्या. त्या चार सेवा प्रमाणित केल्या नंतर ३ जुलैला राष्ट्रीय पथकानी मानांकन पडताळणी केली. याच पडताळणीत आरोग्य केंद्राच्या तपासण्यात आलेल्या बाह्य रुग्ण विभाग, अंतररुग्ण विभाग, प्रसुती विभाग, प्रयोगशाळा, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, सामान्य प्रशासन व परिसर स्वच्छता या सहा सुविधांना प्रमाणित करुन आरोग्य केंद्राला प्रमाणपत्र देण्यात आले होते.

## सेवानिवृत्त नायब सुभेदार हणमंत कदम यांचा सत्कार



आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर येथील सेवानिवृत्त फौजी नायब सुभेदार हणमंत मच्छींद्र कदम यांचा पूजारी नगर सोसायटी फाऊंडेशन सदस्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. नायब सुभेदार हणमंत कदम यांची प्रथम नियुक्ती बेळगाव केंद्र येथे होती. त्यांनतर कारगील,दिल्ली, जम्मू काश्मीर बनिहाल,गुजरात जामनगर, गांधीनगर, अरुणाचल प्रदेश, राज्यस्थान, नवसेरा जम्मुकाश्मीर, शांती सैनिक कांगो आफ्रिका, कानपुर उत्तरप्रदेश आदी ठिकाणी २४ वर्षे सेवाकर्तव्य पार पाडून ३१ मार्च रोजी ते सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतर तुळजापूर येथे दाखल होताच पूजारी नगर फाऊंडेशनच्या वतीने मेजर हणमंत कदम यांचा कौटुंबिक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पूजारी, कार्याध्यक्ष श्रावण पवार,मेजर बाळासाहेब पवार,उमाजी गायकवाड, गणेश जांभळे, कैलास जमादार,तानाजी म्हेत्रे, मनोज चौगुले, हरिदास नाईकवाडी, राहुल जाधव, प्रतिक कांबळे,सिद्धेश्र्वर इंगोले,वैभव ताटे, सोमनाथ पूजारी,नागेश लोंढे,कुणाल गायकवाड, प्रा.अनिल लोमटे आदी उपस्थित होते.

## अचलेर येथे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रेनिमित्त रंगला कुस्त्यांचा फड

आरंभ मराठी । आलूर

अचलेर ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रेनिमित्त श्री मल्लिकार्जुन-बसवेश्र्वर मंदिरा समोरील मैदानात जंगी कुस्त्यांचा फड रंगला. या कुस्ती स्पर्धेसाठी परिसरातील अनेक नामवंत मल्ल , कुस्तीपटू , कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व विजेत्या स्पर्धकांना श्री मल्लिकार्जुन पंच कमीटी तर्फे बक्षीस वितरित करण्यात आले. तसेच या कुस्तीची शेवटची कुस्ती स्पर्धा हिंदकेसरी पैलवान कै. वसंतराव सोलंकर यांच्या स्मरणार्थ शंकरराव वसंतराव सोलंकर यांच्या तर्फे अकरा हजार एकशे अकरा रुपये ( ११,१११)



रुपये व ट्रॉफी देऊन विजेते स्पर्धक पैलवान विकास बलसुरे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी अचलेर येथील नागरिक व सर्व कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिराढोण प्रशालेची गुणवत्तेची परंपरा अविरतपणे सुरू

### नवोदय पाठोपाठ एनएमएमएस परीक्षेतही ३ विद्यार्थ्यांचे यश

आरंभ मराठी । शिराढोण



कळंब तालूक्यातील शिराढोण येथील अटल बिहारी वाजपेई आंतरराष्ट्रीय पीएमश्री आदर्श जिल्हा परीषद प्रशालेचा गुणवत्तेचा आलेख हा उंचावत असून नवोदय परीक्षेतील यशानंतर आता एनएमएमएस परीक्षेत विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.

या प्रशालेतून एनएमएमएस परीक्षेसाठी २० पैकी १३ विद्यार्थी पात्र झाले आहेत. तर शिष्यवृत्ती धारक ३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. सारथी शिष्यवृत्तीसाठी १ विद्यार्थी पात्र ठरला आहे. या परीक्षेत धारक झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास प्रतिवर्षी १५ हजार रुपये सलग ५ वर्ष शिष्यवृत्ती मिळणार आहे.

या एनएमएमएस परीक्षेत शाळेतील दिशा दत्ता धाकतोडे, श्रावणी प्रवीण कस्तूरकर, सोनाली संजय वेळापूरे तर सारथी शिष्यवृत्ती परीक्षेत अशिष अरुण यादव या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शाळेचा व गावाचा नावलौकिक वाढवला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक सुनिल अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक बाळासाहेब काळे, सुनिता पोतदार, कांतीलाल गणगे, मुक्ता ढासाळकर, सचिन शिंदे, संघशिल रोडे यांनी अथक परीश्रम करुन त्यांना मार्गदर्शन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक व शिक्षकांचा दिनांक २ एप्रिल रोजी शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने सन्मान करुन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी उपसरपंच अमोल माकोडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोलसिंह चंदेल, शिक्षकतज्ञ वरुन पाटील, सदस्य अमोल नाईकवाडे, आबासाहेब सहाणे यांची यावेळी उपस्थिती होती.

### या वर्षीच्या तुलनेत पुढील वर्षी ४ पट विद्यार्थी धारक करण्याचा निर्धार

एनएमएमएस परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सहशिक्षका सुनिता पोतदार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, या वर्षी एनएमएमएस परीक्षेत ३ विद्यार्थी धारक होवू शकले आहेत. आगामी काळात ही संख्या ४ पट वाढवून १२ विद्यार्थी धारक करण्याचा प्रयत्न आम्ही सगळेच शिक्षक एकजूटीने करणार असल्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेतही घवघवीत यश

शिराढोण येथील पीएमश्री आदर्श जिल्हा परीषद शाळेतील प्रज्ञाशोध परीक्षेत श्रवण माकोडे, सिध्दी गुरव, मोहम्मदसाद तांबोळी, शिवप्रताप कवडे, एकता रोडे, गणेश सहाने, कैफ शेख व अदिती राउत या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेतील सहशिक्षक विजय कांबळे, सविता रेडेकर, मिनाक्षी दहिवाडे, भाग्यश्री सुरवसे, रमेश व्होके, रमेशकुमार काकडे, अशोक गोसावी, मंजूषा बामणे, शितल जाधव, संजय मरदोडे यांनी मार्गदर्शन केले होते.

# धारातीर्थी पडलेल्या जवानाच्या वारसांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते १ कोटींचा धनादेश




आरंभ मराठी । धाराशिव

भारतीय सैन्य दलात असलेले जिल्ह्याचे सुपुत्र जवान वामन मोहन पवार हे जम्मू-काश्मीरमधील रामबाण येथे कर्तव्यावर असताना २९ सप्टेंबर २०२० रोजी वीरमरण आले.देशासाठी धारातीर्थी पडलेल्या या जिल्ह्याच्या सुपुत्राच्या वीर पत्नी श्रीमती वैशाली पवार आणि वीर पिता मोहन पवार यांना बुधवारी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते १ कोटी रुपयांचा धनादेश देण्यात आला.यावेळी प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी शिरीष यादव,निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

मुख्यमंत्री सहायता (कारगिल) आणि शासकीय निधीतून ही १ कोटी रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.अल्पबचत योजनेमध्ये पाच वर्ष कायम ठेवी स्वरूपात गुंतविण्यासाठी ६० लक्ष रुपये श्रीमती.वैशाली पवार यांचे नावे आणि ४० लक्ष रुपये मोहन पवार यांचे नावे असे एकूण १ कोटी रुपयांचा धनादेश देण्यात आला.